अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.६७/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/४९९९ दि. २३/७/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६७/२०२४

श्री.रमेश विष्णू खामकर
२६४, नारायण पेठ.
पुणे-४११०३०

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.रमेश विष्णू खामकर, २६४ नारायण पेठ, पुणे-४११०३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये ऑनलाईन PUMCO/R/2024/60721 Dt.26/5/2024 (आ.क्र. आ.क्र.२८४३ दि.२७/५/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/२३५०, दि.१०/६/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २६/५/२०२४ | २७/५/२०२४ | २६/६/२०२४ | १०/६/२०२४ | ० |

मी दाखल केलेल्या माहिती अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिलेली आहे. तसेच मी माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे

नाव कळविलेले नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील तरतूदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी व मी माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती मला मिळावी असे नमूद करुन ऑनलाईन (PUMCO/A/2024/60169) दि.१५/६/२०२४ रोजी (आ.क्र.४२२३, दि.१९/६/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १५/६/२०२४ | १९/६/२०२४ | १०/७/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.१६/७/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/३५०५, दि.०९/०७/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस **अपिलार्थी अनुपस्थित होते. ईमेलद्वारे दि.१५/७/२०२४ लेखी म्हणणे दाखल केले आहे.** माहिती देताना श्री.अविनाश वंजारी, जन माहिती अधिकारी होते. श्री.अविनाश वंजारी सुनावणी वेळी वैद्यकिय रजेवर असल्याने श्रीमती योगिता जायभाई या विद्यमान जन माहिती अधिकारी असून त्या सुनावणीस उपस्थित होत्या.

## विवेचन

मी दाखल केलेल्या माहिती अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिलेली आहे. तसेच मी माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे नाव कळविलेले नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील तरतूदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी व मी माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती मला मिळावी असे नमूद करुन ऑनलाईन (PUMCO/A/2024/60169) दि.१५/६/२०२४ रोजी (आ.क्र.४२२३, दि.१९/६/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये ऑनलाईन PUMCO/R/2024/60721 Dt.26/5/2024 (आ.क्र. आ.क्र.२८४३ दि.२७/५/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. आरोग्य निरिक्षक पदाकरिता दि.२२/१२/२०२३ चे कार्यालय परिपत्रकानंतर विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज, अर्जावरील कार्यवाही, अर्जावर कार्यवाही करणाऱ्या जबाबदार अधिकारी यांची माहिती, पदोन्नती नियुक्ती देणेकामी शासन निर्णय व प्रक्रिया याबाबत माहिती अधिकार अर्जात मागितली आहे.

अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते. सुनावणीचे अनुषंगाने दि.१५/७/२०२४ रोजी लेखी म्हणणे सादर केले आहे. लेखी म्हणण्यामधील मुद्दे पुढीलप्रमाणे:-

1. माहिती अधिकार कायद्यांतर्गत आरोग्य निरीक्षक या पदाकरिता पदोन्नतीने नियुक्ती देणेकामी प्रक्रियेबाबत ४ मुद्यांवर माहिती मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे.
2. मला अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला.

3. माझ्या माहिती अर्जावर श्री.अविनाश वंजारी, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी मला अपूर्ण माहिती दिलेली आहे. **मला पुरविण्यात आलेल्या माहिती मध्ये मुद्दा क्र १ मध्ये नमूद केल्यानुसार जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे नाव याची माहिती मिळाली नाही. तसेच मुद्दा क्र ४ नुसार शासन निर्णयाची माहिती अपूर्ण दिलेली आहे. पदोन्नती प्रक्रियेबाबत शासनाकडून मार्गदर्शक तत्वे याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे.**

4. अपील सुनावणीच्या वेळी या पत्राद्वारे/ ई मेल द्वारे मी दाखल केलेले लेखी म्हणणे विचारात घेऊन नैसर्गिक न्याय तत्वानुसार उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन होऊन उचित कार्यवाही करण्यात यावी व माहिती अर्जात मागणी केलेली माहिती विनामुल्य मिळावी.

मूळ माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र.१ मध्ये दि.२२/१२/२०२३ चे कार्यालय परिपत्रकानुसार विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज व त्यावर केलेल्या शेरांकन व जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती मागण्यात आली आहे. त्याबाबत माहितीमध्ये नमूद करुन अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे. तसेच, मुद्दा क्र.४ नुसार माहिती देण्यात आली असल्याचे सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अपिलार्थी यांनी अपिलाचे अनुषंगाने दिलेला लेखी खुलासा व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे विचारात घेता मूळ माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र.१ मध्ये प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्याऱ्या अधिकारी/सेवकांची पदनिहाय माहिती नमूद आहे. कोणतेही कार्यालयीन कामकाज खातेप्रमुखांचे आदेशानुसार प्रकरण निहाय अधिकारी/सेवकांची जबाबदारी निश्चित करुन पार पाडले जाते. तसेच, मुद्दा क्र.४ नुसार माहिती देण्यात आली असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अभिलेखे उपलब्ध करुन देणे अभिप्रेत असल्याचे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी मुद्दा क्र.१ ची दिलेली माहिती योग्य आहे. मुद्दा क्र.४ ची माहिती अवलोकनासाठी अपिलार्थी यांना कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध करुन देवून आवश्यक अभिलेखे विनामूल्य आदेश प्राप्तीपासून १५ दिवसात देण्यात यावेत. त्यानुसार, सदर अपिल क्र.६७/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.